# शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांसाठी महत्वपुर्ण सुचना

भारत सरकार शिष्यवृत्ती आणि इतर सर्व प्रकारच्या शिष्यवृत्तीसाठी पात्र असणाऱ्या आणि शिष्यवृत्तीसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने शिष्यवृत्तीच्या पात्रतेसाठी प्रत्येक विद्यार्थ्याची महाविद्यालयातील किमान उपस्थिती ७५% असावी आणि ती उपस्थिती बायोमॅट्रीक मशिनवर नोंदविलेली असावी. अशी महत्वपुर्ण अट टाकलेली आहे.

शासनाच्या या निर्णयामुळे महाविद्यालयात बायोमॅट्रीक मशिन्स उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने महाविद्यालयात येऊन बायोमॅट्रीक मशिनवर आपले रजिस्ट्रेशन करवुन घ्यावे आणि दररोज महाविद्यालयात गणवेशात उपस्थित राहुन बायोमॅट्रीक मशिन समोर आपली उपस्थिती नोंदवावी.

आपली उपस्थिती ही ७५% पेक्षा कमी भरली आणि शासनाने आपली शिष्यवृत्ती नाकारली तर त्यासाठी महाविद्यालय प्रशासन जबाबदार राहणार नाही. शिवाय त्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती शासनाने नाकारली असेल त्या विद्यार्थ्याला स्वत: जवळून महाविद्यालयीन फी (शुल्क) भरणे अनिवार्य राहील.

सर्व शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांनी याची गांर्भियाने नोंद घ्यावी.

प्राचार्य